Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। रविवार, दि. २१ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ७५ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

धुळे जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासाला गती!

(पान २ वर)



✓ » Selected

## गोमांस वाहतुकीच्या संशयावरून वाहन तपासणी

**जळगाव| प्रतिनिधी :** गोमांस वाहतुकीच्या संशयावरून एका मालवाहू वाहनाची चौकशी करणाऱ्या गोसेवकांवर लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्यांनी जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना जळगाव शहरातील शिवाजीनगर परिसरातील उस्मानिया पार्क येथे घडली. या हल्ल्यात दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १८ जून रोजी जखमी गोसेवक योगेश गोपाळ साळी हे आपल्या काही मित्रांसह कानळदा रोड परिसरात होते. त्यावेळी त्यांना एक मालवाहू वाहन (एमएच-०४ एचडी-७५२९) संशयास्पद अवस्थेत दिसले. वाहनातून दुर्गंधी येत असल्याने त्यांनी वाहन चालकाकडे चौकशी करण्याचा प्रयत्न केला.

## ओमराजे निंबाळकरांच्या भूमिकेमुळे शिंदे गटाची रणनीती बदलली

# ठाकरे गटाच्या 6 खासदारांच्या प्रवेशाला ब्रेक?

### स्वतंत्र गटाची आधी घोषणा होणार; कायदेशीर प्रक्रिया पूर्ण, मात्र ओमराजेंच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील सहा खासदारांच्या शिंदे गटातील प्रवेशाची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात केंद्रस्थानी आहे. मात्र खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या भूमिकेमुळे ही प्रक्रिया काही काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

- ठाकरे गटातील ६ खासदारांचा शिंदे गटात प्रवेश लांबणीवर
- ओमराजे निंबाळकर दोन दिवसांत जाहीर करणार भूमिका
- लोकसभा सचिवालयाकडून स्वतंत्र गटाची घोषणा अपेक्षित
- पवनराजे हत्या प्रकरणाच्या निकालानंतर राजकीय समीकरणे बदलली
- ओमराजेंची नाराजी दूर करण्यासाठी शिंदेंचा पुढाकार



मतदारसंघाचा दौरा करून स्थानिक कार्यकर्ते व समर्थकांशी चर्चा केल्यानंतरच पुढील राजकीय भूमिका जाहीर करणार असल्याचे ओमराजे निंबाळकर यांनी स्पष्ट केल्याने शिंदे गटालाही काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, ठाकरे गटातील सहा खासदारांच्या शिंदे गटातील विलीनीकरणाची किंवा पक्षप्रवेशाची घोषणा रविवारी अथवा सोमवारी होण्याची शक्यता होती. त्यासाठी सर्व तयारी पूर्ण करण्यात आली होती. मात्र पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणातील न्यायालयीन निकालानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे ओमराजे यांनी सावध भूमिका घेतली आहे. शिंदे गटाच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खासदार संजय देशमुख, संजय दिना पाटील, संजय जाधव, नागेश आष्टीकर पाटील, भाऊसाहेब वाकचौरे आणि ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे स्वतंत्र गट स्थापन करण्याबाबत पत्र सादर केले आहे. संबंधित कायदेशीर प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असून लोकसभा सचिवालयाकडून त्याबाबत अधिकृत घोषणा होण्याची प्रतीक्षा आहे. स्वतंत्र गटाची अधिकृत नोंद झाल्यानंतरच या खासदारांच्या शिंदे गटातील प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या या घडामोडींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यावर अन्याय झाल्याचा दावा केला. "गेल्या १७ वर्षांपासून आम्ही न्यायासाठी लढत होतो. कोणताही संबंध नसताना पद्मसिंह पाटील यांना या प्रकरणात गोवण्यात आले. अखेर न्यायालयाने सत्य समोर आणले आहे," असे ते म्हणाले.

### ओमराजेंची नाराजी दूर करण्यासाठी पुढाकार

पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणातील निकालानंतर ओमराजे निंबाळकर नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा केल्याची माहिती समोर आली आहे. सीबीआय विशेष न्यायालयाच्या निकालाविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्याबाबत सीबीआय सकारात्मक असल्याचे शिंदे यांनी जाहीर केले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## गिरणा धरणातून पिण्याच्या पाण्याचे शेवटचे आवर्तन सुरू

### पाणी जपून वापरण्याचे पालकमंत्र्यांचे आवाहन

**जन सम्राट टाईम्स**



**जळगाव | प्रतिनिधी:** जिल्ह्यातील नागरिकांना उन्हाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पालकमंत्री GULABRAO PATIL यांच्या निर्देशानुसार महसूल, जलसंपदा आणि पोलीस विभागाच्या समन्वयातून शनिवार, २० जून २०२६ रोजी सकाळी ६ वाजता GIRNA DAM मधून पिण्याच्या पाण्यासाठी बिगर सिंचन आवर्तन सुरू करण्यात आले. हे यंदाच्या हंगामातील शेवटचे आवर्तन असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. या आवर्तनाद्वारे गिरणा नदीपात्रात सुमारे २००० क्युसेक्स (५६.६३ क्युमेक्स) पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी ROHAN GHUGHE यांच्या आदेशानुसार गिरणा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता VINOD PATIL आणि त्यांच्या पथकाने ही कार्यवाही केली. केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच आवर्तन प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हे आवर्तन केवळ पिण्याच्या पाण्याच्या गरजांसाठी सोडण्यात आले असून शेतीसाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी पाण्याचा वापर करू नये. नदीकाठच्या शेतकऱ्यांनी पंप बंद ठेवावेत तसेच नदीपात्रातून कोणत्याही प्रकारचा अनधिकृत पाणी उपसा करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संयुक्त पथकांची गस्त सुरू जलसंपदा विभागाच्या १३ जून २०२६ च्या परिपत्रकानुसार, एल-निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त पथके स्थापन करण्यात आली आहेत. ही पथके नदीपात्रात नियमित गस्त घालून अनधिकृत मोटारी, पंप, पाईपलाईन आणि बेकायदेशीर पाणी उपशावर लक्ष ठेवणार आहेत. अनेक गावांना मिळणार दिलासा हे आवर्तन भडगाव, पाचोरा तसेच दहिगाव बंधारा ते कानळदा परिसरापर्यंत पोहोचणार असल्याने या भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पुण्याचे डॉ. खरपुडे मालावी प्रजासत्ताक 'ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर'पदी

### भारत-मालावी आर्थिक संबंधांना मिळणार नवी गती; उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महत्त्वाचे पाऊल

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** भारत आणि मालावी यांच्यातील व्यापार व आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. भारतातील मालावीचे उच्चायुक्त लिओनार्ड मेंगेझी यांनी पुण्याचे डॉ. संकेत खरपुडे यांची पुणे व महाराष्ट्र क्षेत्रासाठी मालावीचे ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर (TIC) म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती भारत आणि मालावी यांच्यातील द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक आणि व्यावसायिक सहकार्य वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. व्यापार आणि गुंतवणूक आयुक्त हे पद राजनैतिक आणि आर्थिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असून, दोन्ही देशांमधील उद्योग व व्यावसायिक संबंध मजबूत करण्यासाठी या पदाची भूमिका निर्णायक असते. गुंतवणूक आणि व्यापार विस्तारावर भर ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशनर म्हणून डॉ. संकेत खरपुडे यांच्यावर महाराष्ट्रातील उद्योजकांना मालावीमधील गुंतवणुकीच्या संधींची माहिती देणे, दोन्ही देशांतील व्यापारवृद्धीस चालना देणे आणि व्यावसायिक नेटवर्क मजबूत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण,



उत्पादन आणि सेवा क्षेत्रात भारत आणि मालावी यांच्यातील आयात-निर्यात वाढविण्यासाठी ते विशेष प्रयत्न करणार आहेत. तसेच दोन्ही देशांतील व्यावसायिक समुदायांमध्ये दुवा म्हणून काम करत नवीन उद्योग संधी निर्माण करण्यावर त्यांचा भर असेल. पुण्याच्या उद्योगविश्वासाठी मोठी संधी पुणे हे देशातील प्रमुख औद्योगिक, आयटी आणि शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. त्यामुळे डॉ. खरपुडे यांच्या नियुक्तीमुळे पुणे आणि महाराष्ट्रातील उद्योगांना आफ्रिकन बाजारपेठेत, विशेषतः मालावीमध्ये व्यवसाय विस्ताराची नवी दालने खुली होणार आहेत. या माध्यमातून स्थानिक उद्योग, स्टार्टअप्स, निर्यातदार आणि गुंतवणूकदारांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नवे व्यासपीठ उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच भारत-मालावी आर्थिक सहकार्य अधिक बळकट होऊन व्यापारवृद्धीस चालना मिळणार असल्याचे जाणकारांचे मत आहे. सर्व स्तरांतून अभिनंदन डॉ. संकेत खरपुडे यांच्या या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल उद्योग, शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या माध्यमातून पुणे आणि महाराष्ट्रातील उद्योगांना जागतिक स्तरावर नवीन संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ही नियुक्ती केवळ डॉ. खरपुडे यांच्यासाठीच नव्हे, तर पुणे आणि महाराष्ट्राच्या उद्योगविश्वासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे.

## पहिल्याच प्रयत्नात सीए बनून ऋषी मंत्री यांची यशस्वी भरारी

### ३२० गुणांसह चार्टर्ड अकाउंटंट अंतिम परीक्षा उत्तीर्ण; जळगावच्या सुपुत्राचे उल्लेखनीय यश

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव| प्रतिनिधी :** जळगाव येथील रहिवासी तसेच गाडेगाव येथील सुप्रीम इंडस्ट्रीज लिमिटेडमध्ये कमर्शियल हेड म्हणून कार्यरत असलेले सीए सुरेश मंत्री यांचे सुपुत्र ऋषी सुरेश मंत्री यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अंतिम परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दोन्ही गटांमध्ये एकूण ३२० गुण मिळवत त्यांनी कुटुंबासह जळगाव जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. देशातील सर्वाधिक



कठीण आणि प्रतिष्ठेच्या व्यावसायिक परीक्षांपैकी एक मानल्या जाणाऱ्या सीए परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते. ऋषी यांनी मुंबई येथील नामांकित चतुर्वेदी अँड शाह चार्टर्ड अकाउंटंट्स या संस्थेमध्ये आर्टिकलशिप पूर्ण केली. कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि शिस्तबद्ध अभ्यासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले. ऋषी यांच्या या यशामुळे मंत्री कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आपल्या यशाचे श्रेय देताना ऋषी यांनी आई-वडील, गुरुजन, आर्टिकलशिपदरम्यान लाभलेले मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचा विशेष उल्लेख केला. "समर्पण, सकारात्मक दृष्टिकोन आणि अथक प्रयत्न यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते," असे त्यांनी यावेळी सांगितले. ऋषी मंत्री यांचे हे यश सीएची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हे त्यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे. अभिनंदनाचा वर्षाव ऋषी मंत्री यांच्या या यशाबद्दल सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## छ.शिवाजी महाराज टर्मिनसचा २० जून रोजी वर्धापन दिन उत्साहात



**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** मुंबईची शान आणि भारतीय रेल्वेचा ऐतिहासिक वारसा जपणारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाचा वर्धापन दिन दरवर्षी २० जून रोजी साजरा केला जातो. १८८७ मध्ये राणी व्हिक्टोरियाच्या राज्याभिषेकाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त या भव्य वास्तूचे बांधकाम पूर्ण झाले आणि २० जून १८८७ पासून हे स्थानक पूर्ण क्षमतेने कार्यरत झाले. वैभवशाली प्रवास सुरुवातीला हे स्थानक 'बोरीबंदर' या नावाने ओळखले जात होते. भारतातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी बोरीबंदर ते ठाणे या मार्गावर धावली होती. या ऐतिहासिक घटनेने भारतीय रेल्वे युगाची सुरुवात झाली. जुन्या बोरीबंदर स्थानकाच्या जागी नव्या भव्य इमारतीचे बांधकाम १८७८ मध्ये सुरू करण्यात आले. ब्रिटिश वास्तुविशारद फ्रेडरिक व्हिल्यम स्टेवन्स यांनी इंडो-गोथिक आणि व्हिक्टोरियन शैलीचा संगम साधत या वास्तूची रचना केली. जवळपास दहा वर्षांच्या कालावधीनंतर १८८७ मध्ये हे बांधकाम पूर्ण झाले.नावात झाले अनेक बदल स्थानकाला सुरुवातीला व्हिक्टोरिया टर्मिनस (VT) असे नाव देण्यात आले होते. १९९६ मध्ये महाराष्ट्राच्या आराध्य दैवताचे स्मरण ठेवत त्याचे नामकरण छत्रपती शिवाजी टर्मिनस (CST) असे करण्यात आले. त्यानंतर २०१७ मध्ये 'महाराज' हा शब्द जोडून त्याला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) हे अधिकृत नाव देण्यात आले. युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा या वास्तूचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि स्थापत्यशास्त्रीय महत्त्व लक्षात घेऊन UNESCO ने ७ जुलै २००४ रोजी सीएसएमटीला जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली.हा सन्मान मिळालेल्या भारतातील महत्त्वाच्या ऐतिहासिक वास्तूंमध्ये सीएसएमटीचा समावेश आहे. देशातील सर्वाधिक वर्दळीच्या स्थानकांपैकी एक आज सीएसएमटी हे CENTRAL RAILWAY चे मुख्यालय असून देशातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि आकर्षक रेल्वे स्थानकांपैकी एक मानले जाते. दररोज लाखो प्रवासी या स्थानकातून प्रवास करतात. ऐतिहासिक वारसा, भव्य स्थापत्यकला आणि आधुनिक रेल्वे व्यवस्थेचा सुंदर संगम असलेले सीएसएमटी मुंबईच्या ओळखीचा अविभाज्य भाग बनले आहे. वर्षानुवर्षे प्रवाशांच्या सेवेत असलेले हे स्थानक केवळ रेल्वे वाहतुकीचे केंद्र नसून भारतीय इतिहास, वास्तुकला आणि सांस्कृतिक वारशाचे जिवंत प्रतीक म्हणून आजही अभिमानाने उभे आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## पावसाअभावी पेरण्या रखडल्या; शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे

### जून महिना संपत आला तरी समाधानकारक पाऊस नाही; दुबार पेरणीच्या भीतीने शेतकरी चिंतेत

**जन सम्राट टाईम्स**



**भुसावळ | प्रतिनिधी :** जून महिना संपत आला असतानाही भुसावळ तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. मान्सूनच्या आगमनाकडे आशेने डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना अद्यापही पावसाने हुलकावणी दिल्याने खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या असून शेतीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत. खरीप हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी आधीच खते, बियाणे आणि शेतीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करून ठेवले आहे. मात्र, पावसाअभावी या साहित्याचा उपयोग करता येत नसल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक तणावाखाली आहेत. तालुक्यातील शिंदी, मोंढाळा, तळवेल, वरणगाव, फुलगाव, पिंपळगाव, वेल्हाळे, वांजोळा आदी भागांमध्ये काही शेतकऱ्यांनी अल्प उपलब्ध पाण्याच्या भरोशावर पेरणी सुरू केली आहे. तळवेल आणि परिसरात जिरायती क्षेत्रावरही मक्याची धूळपेरणी करण्यात आली आहे. मात्र, पावसाची साथ न मिळाल्यास या पेरण्या धोक्यात येण्याची शक्यता आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यात आतापर्यंत सुमारे १ हजार ८८७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली आहे. परंतु, लवकरच पाऊस न झाल्यास जमिनीत टाकलेले बियाणे उगवणार नाही आणि त्यासाठी झालेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच पिकांची उगवण न झाल्यास शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे खरेदी करून दुबार पेरणी करावी लागणार असून त्याचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. मान्सूनच्या आगमनात होत असलेल्या विलंबाचा फटका केवळ शेती क्षेत्रालाच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही बसू लागला आहे. परिसरातील विहिरी, बोअरवेल आणि पाणवठ्यांची पातळी दिवसेंदिवस घटत असल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे शेतकरी, बागायतदार आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, हवामान विभागाकडून लवकरच पावसाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असली तरी प्रत्यक्षात समाधानकारक पाऊस कधी पडणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे. शेतकऱ्यांसाठी येणारे काही दिवस अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, वेळेत पाऊस झाल्यास खरीप हंगामाला दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार

मात्र, पावसाची साथ न मिळाल्यास या पेरण्या धोक्यात येण्याची शक्यता आहे. कृषी विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यात आतापर्यंत सुमारे १ हजार ८८७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली आहे. परंतु, लवकरच पाऊस न झाल्यास जमिनीत टाकलेले बियाणे उगवणार नाही आणि त्यासाठी झालेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच पिकांची उगवण न झाल्यास शेतकऱ्यांना पुन्हा बियाणे खरेदी करून दुबार पेरणी करावी लागणार असून त्याचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. मान्सूनच्या आगमनात होत असलेल्या विलंबाचा फटका केवळ शेती क्षेत्रालाच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही बसू लागला आहे.

# पिंपळनेर नगरपरिषदेच्या पोटनिवडणुकीत महायुतीतच प्रतिष्ठेची लढत

## दोन जागांसाठी चार उमेदवार रिंगणात, निकालाकडे सर्वांचे लक्ष

जन सम्राट टाईम्स

**पिंपळनेर (धुळे):। प्रतिनिधी:** पिंपळनेर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मधील पोटनिवडणुकीसाठी आज सकाळी ७.३० वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली. सकाळच्या सत्रात मतदानाचा वेग तुलनेने मंद होता. मात्र दुपारपर्यंत मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान केंद्रांकडे धाव घेतल्याने मतदानाची टक्केवारी सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांच्यात थेट सामना होत असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष या लढतीकडे लागले आहे.

गत डिसेंबर महिन्यात झालेल्या पिंपळनेर नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपने बहुमत मिळवत सत्ता हस्तगत केली होती. मात्र काही महिन्यांपूर्वी प्रभाग क्रमांक २ मधील भाजपच्या नगरसेविका कुसुमबाई खांडू पाथरे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याने ही जागा रिक्त झाली होती. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने या जागेसाठी पोटनिवडणुकीची घोषणा केली होती. या पोटनिवडणुकीत दोन जागांसाठी एकूण चार उमेदवार रिंगणात आहेत. अनुसूचित जमाती (पुरुष) राखीव गटातून भाजपने संजय सखाराम ठाकरे यांना उमेदवारी दिली असून त्यांच्यासमोर शिवसेनेचे दिलीप नीलकंठ चौरे यांचे आव्हान आहे. तर सर्वसाधारण महिला राखीव गटातून भाजपच्या तैमून नौशाद सैयद या उमेदवार असून त्यांच्याविरुद्ध शिवसेनेच्या वसीमा आबिद शेख निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत विजय कोणाचा होणार याबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, या पोटनिवडणुकीमुळे भाजप आणि शिवसेना यांच्यातील स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे पुन्हा चर्चेत आली आहेत. राजकीय जाणकारांच्या मते, नगरपरिषदेमधील सत्तासमीकरण कायम राखण्यासाठी भाजपला किमान एक जागा जिंकणे आवश्यक आहे. दुसरीकडे शिवसेनेला सत्तेच्या समीकरणात निर्णायक भूमिका मिळवण्यासाठी दोन्ही जागांवर विजय मिळवणे महत्त्वाचे मानले जात आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ दोन जागांसाठीची नसून स्थानिक राजकारणातील प्रतिष्ठेची लढत ठरत आहे.



### व्हॉट्सअॅप ग्रुपवर अपमानास्पद मजकूर

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून प्रशासनाने आवश्यक बंदोबस्त तैनात केला होता. आज पिंपळनेर नगरपरिषद परिसरात मतमोजणी होणार असून, निकालानंतर नगरपरिषदेतील सत्तेचे चित्र स्पष्ट होणार आहे. भाजप आपले वर्चस्व कायम राखणार की शिवसेना बाजी मारणार, याचा फैसला आता ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाला असून सर्वांच्या नजरा उद्याच्या निकालाकडे लागल्या आहेत.

# आयुक्तांच्या आश्वासनानंतर पदविकाधारक पशुवैद्यकांचे २२ जूनचे धरणे आंदोलन स्थगित

## आमदारांना निवेदने देण्याचे डॉ. लोखंडे यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स




**नशिराबाद । प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील पदविकाधारक पशुवैद्यक संवर्गाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवार, २२ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेले राज्यव्यापी एकदिवसीय धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. पशुसंवर्धन आयुक्तांनी सकारात्मक चर्चेचे आश्वासन देत संघटनेला आंदोलन पुढे ढकलण्याची विनंती केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती 'पशुवैद्यकीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवस्थापन सेवा संघ, महाराष्ट्र राज्य'चे जळगाव जिल्हाध्यक्ष डॉ. दीपक लोखंडे यांनी दिली. संघटनेच्या शिष्टमंडळाने नुकतीच पशुसंवर्धन आयुक्तांची भेट घेऊन पदविकाधारक पशुवैद्यकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. या बैठकीत आयुक्तांनी विभागात नुकतीच नियुक्ती झाल्यामुळे सर्व मागण्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी काही कालावधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. तसेच संघटनेच्या प्रतिनिधींशी विस्तृत चर्चा करून न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली. बैठकीदरम्यान आयुक्तांनी चर्चेतून समाधानकारक तोडगा न निघाल्यास संघटनेला आंदोलनाचा मार्ग कायम खुला राहील, असे स्पष्ट केले. त्यांच्या या भूमिकेचा आदर राखत संघटनेने २२ जून रोजीचे नियोजित धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात 'दुय्यम पशुवैद्यक परिषद विधेयक' चर्चेसाठी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व पदविकाधारक पशुवैद्यकांनी आपल्या मतदारसंघातील आमदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन संघटनेच्या मागण्यांचे निवेदन सादर करावे आणि न्याय्य हक्कांसाठी विधानमंडळात आवाज उठवण्याची विनंती करावी, असे आवाहन डॉ. दीपक लोखंडे यांनी केले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, पदविकाधारक पशुवैद्यकांच्या सेवाशर्ती, अधिकार आणि व्यावसायिक प्रश्नांवर दीर्घकाळापासून निर्णय प्रलंबित आहेत. त्यामुळे शासनाने या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. ही माहिती संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सु. वा. कुलकर्णी, कार्याध्यक्ष डॉ. सागर आरुटे, राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी आणि सदस्य तसेच जळगाव जिल्हाध्यक्ष डॉ. दीपक लोखंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. संघटनेने शासनासोबत संवादाचा मार्ग कायम ठेवत प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# लायन्स क्लब ऑफ पुणे अग्रसेनची कार्यकारिणी जाहीर

## विनोद अग्रवाल यांच्यावर शहराध्यक्षपदाची धुरा







जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी :** लायन्स क्लब ऑफ पुणे अग्रसेनच्या 2026-27 या वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत एकमताने करण्यात आली. यामध्ये विनोद कुमार अग्रवाल यांची पुणे शहराध्यक्षपदी, शुभ अग्रवाल यांची सचिवपदी आणि संजय जालान यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीच्या घोषणेनंतर क्लबच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांना आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. समाजोपयोगी आणि सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून क्लबचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. बैठकीत आगामी वर्षात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सामाजिक जनजागृती तसेच गरजू घटकांसाठी विविध सेवा प्रकल्प राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजहिताच्या उपक्रमांना अधिक गती देत नागरिकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यासाठी सर्व सदस्यांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी लायन्स डिस्ट्रिक्ट गव्हर्नर राजेश सुरेंद्रकुमार अग्रवाल, माजी अध्यक्ष रवी अग्रवाल, राजेश बन्सल, सीमा मनोज अग्रवाल यांच्यासह क्लबचे अनेक पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीच्या नेतृत्वाखाली लायन्स क्लब ऑफ पुणे अग्रसेन समाजसेवेची परंपरा अधिक बळकट करत विविध लोकहितकारी उपक्रम राबवेल, असा विश्वास उपस्थित सदस्यांनी व्यक्त केला.

### विविध सेवा प्रकल्प राबविण्यावर भर

नवीन कार्यकारिणीच्या घोषणेनंतर क्लबच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांना आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. समाजोपयोगी आणि सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून क्लबचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. बैठकीत आगामी वर्षात आरोग्य, सामाजिक जनजागृती तसेच गरजू घटकांसाठी विविध सेवा प्रकल्प राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजहिताच्या उपक्रमांना अधिक गती देत नागरिकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यासाठी सर्व सदस्यांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# प्रभाग रचनेत अनुसूचित जाती प्रवर्गाला डावलल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** भुसावळ तालुक्यातील आचेगाव येथे सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर ११ जून रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेत मंजूर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेवर वाद निर्माण झाला आहे. अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गाला आरक्षणात स्थान न दिल्याचा आरोप करत समाजसेवक प्रकाश रामा सुरवाडे यांनी उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) भुसावळ यांच्याकडे लेखी हरकत नोंदवली आहे. ११ जून रोजी आयोजित विशेष ग्रामसभेत गावाच्या प्रभाग रचनेचा आराखडा सादर करण्यात आला. या रचनेत विविध प्रवर्गांना प्रतिनिधित्व देण्यात आले असले, तरी अनुसूचित जाती प्रवर्गाला कोणतेही स्थान देण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे संबंधित समाजामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रकाश सुरवाडे यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, आचेगावमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गाची लोकसंख्या सुमारे २५० ते ३०० दरम्यान असून गेल्या १५ ते २० वर्षांपासून या समाजातील अनेक कुटुंबे गावात वास्तव्यास आहेत. एवढी लक्षणीय लोकसंख्या असतानाही प्रभाग रचना आणि आरक्षण प्रक्रियेत या प्रवर्गाला स्थान न देणे ही अन्यायकारक बाब असून लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तक्रारीत प्रभाग रचना आणि आरक्षणाची फेरतपासणी करून अनुसूचित जाती प्रवर्गाला न्याय मिळेल अशा पद्धतीने फेरआरक्षण जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाने या हरकतीची दखल घेत संबंधित प्रकरणाची नोंद केली असून ३ जुलै रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. या सुनावणीत दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

# नगावमध्ये योग दिनाची पूर्वसंध्या उत्साहात; विद्यार्थ्यांनी घेतले योगाचे धडे

## माजी आ.अण्णासाहेब द.वा. पाटील शैक्षणिक संकुलात विविध योगासनांचे प्रात्यक्षिक

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** जागतिक योग दिनाच्या पूर्वसंध्येला नगाव येथील माजी आमदार अण्णासाहेब द.वा. पाटील शैक्षणिक संकुलात योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आमदार राम भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत योगसाधनेचे महत्त्व जाणून घेतले. कार्यक्रमात योग विद्या धामचे निवृत्त अभियंता विजय जाधव आणि योगशिक्षिका संस्कृती जैन यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांसारख्या क्रिया विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आल्या. यावेळी बोलताना विजय जाधव म्हणाले, "योग हा केवळ व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांना जोडणारा सेतू आहे. नियमित योगाभ्यासामुळे एकाग्रता वाढते, तणाव कमी होतो आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो."

योगशिक्षिका संस्कृती जैन यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब मनोहर भदाणे, प्राचार्य एस. आर. पाटील, निवृत्त मुख्याध्यापक आर. आर. पाटील, प्राचार्य मनोहर बाविस्कर, प्राचार्य पोद्दार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शैक्षणिक संकुलातील सर्व शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आमदार राम भदाणे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जगभर योग दिन साजरा होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत योग पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसते." योग दिनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली असून निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

# पावसाळ्याच्या तोंडावर नशिराबादमध्ये 'यमराज' उघड्यावर

## आठवडे बाजारातील उघड्या डीपीमुळे नागरिकांच्या जीवितास धोका

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद। प्रतिनिधी :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना नशिराबाद येथील आठवडे बाजार परिसरात महावितरणच्या निष्काळजी कारभारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. बाजारातील मुख्य ठिकाणी असलेली विद्युत वितरण पॅनेल (डीपी) उघड्या आणि मोडकळीस आलेल्या अवस्थेत असून, उघड्या विद्युत तारा आणि असुरक्षित केबल्समुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आठवडे बाजारात दररोज मोठ्या प्रमाणात व्यापारी, ग्राहक, महिला आणि लहान मुलांची वर्दळ असते. अशा गर्दीच्या ठिकाणी असलेली डीपी पूर्णपणे उघडी असल्याने तिच्यामधील फ्यूज, विद्युत जोडण्या आणि उच्चदाबाच्या तारा थेट उघड्यावर दिसून येत आहेत. विशेष म्हणजे परिसरात कचरा आणि पालापाचोळा साचलेला असून, पावसाळ्यात येथे पाणी साचल्यास विजेचा प्रवाह परिसरात पसरण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. याशिवाय डीपीलगतच्या रस्त्यावर विजेच्या जाड केबल्स जमिनीवरच पडलेल्या असल्याचे चित्र दिसून येत आहे. या गंभीर परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते रोहित बाळू चौधरी यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले



आहे. त्यांनी सांगितले की, अपघात झाल्यानंतर चौकशी करण्यापेक्षा तो होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी महावितरणने सर्व उघड्या डीपी आणि धोकादायक विद्युत तारा तातडीने सुरक्षित कराव्यात, अन्यथा संभाव्य दुर्घटनेची जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशाराही त्यांनी दिला. स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनीही या समस्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत त्वरित दुरुस्तीची मागणी केली आहे. पावसाळ्यात ओलाव्यामुळे विजेचा धक्का लागण्याच्या घटना घडू शकतात. त्यामुळे उघडी डीपी आणि लोंबकळणाऱ्या तारा नागरिकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी संबंधित वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पुढील २४ तासांत डीपी बॉक्स सुरक्षित करावेत, उघड्या तारांची दुरुस्ती करावी आणि संपूर्ण परिसरातील विद्युत यंत्रणा सुरक्षित करावी, अशी मागणी केली आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास नागरिकांच्या सुरक्षेसाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# धुळे जिल्हा क्रीडा संकुलाच्या विकासाला गती!

## खेळाडू घडविण्यासाठी सुविधांवर भर



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे जिल्हा क्रीडा संकुलाचा सर्वांगीण विकास करून जिल्ह्यातील खेळाडूंना अत्याधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना महाराष्ट्र सहसचिव अॅड. पंकज गोरे यांनी पुढाकार घेतला आहे. वाढीव अनुदानातून प्रस्तावित विकासकामांच्या अंदाजपत्रक व आराखड्यांना तांत्रिक मान्यता मिळावी, यासाठी त्यांनी मुंबई व नाशिक विभागाचे मुख्य अभियंता प्रशांत औटी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी धुळे जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आधुनिक क्रीडा संकुलाचे महत्त्व अधोरेखित करत, उत्कृष्ट सुविधा उपलब्ध झाल्यास येथूनही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तसेच ऑलिम्पिक दर्जाचे खेळाडू घडू शकतात, अशी भूमिका अॅड. गोरे यांनी मांडली. शासनाने जिल्हा क्रीडा संकुलासाठी अनुदान मर्यादेत वाढ केल्यानंतर त्याअंतर्गत विविध विकासकामांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यास मंजुरीही मिळाली आहे. त्यानंतर धुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष यांनी काही अतिरिक्त विकासकामांचा समावेश करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार वास्तुविशारद संस्थेमार्फत सुधारित अंदाजपत्रक व आराखडे तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. प्रस्तावित विकासकामांमध्ये ४०० मीटर सिंथेटिक रनिंग ट्रॅक, मुलींच्या वसतिगृहाचा दुसरा मजला, फुटबॉल मैदान, कुस्ती व जिम्नॅस्टिक हॉल, पेव्हर ब्लॉक बसविणे, भूमिगत पाणी टाकी, जलतरण तलावाची दुरुस्ती, संरक्षण भिंत आणि संपूर्ण मैदानासाठी विद्युत व प्रकाशयोजना यांचा समावेश आहे. या सर्व कामांसाठी सुमारे १८ कोटी ३४ लाख २० हजार ७२१ रुपये इतका अंदाजित खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. संबंधित आराखडे आणि अंदाजपत्रकांना तातडीने तांत्रिक मान्यता देण्यात यावी, जेणेकरून पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन विकासकामांना गती मिळेल, अशी विनंती अॅड. पंकज गोरे यांनी मुख्य अभियंता प्रशांत औटी यांच्याकडे केली. धुळे जिल्हा क्रीडा संकुलाचा विकास झाल्यास स्थानिक खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील आणि भविष्यात धुळे जिल्ह्याचे खेळाडू राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकून महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर घालतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स अँकर न्यूज ज

# भांडुप जलशुद्धीकरण प्रकल्पात अभियंत्यांची उल्लेखनीय कामगिरी

## २००० दशलक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पात अभियंत्यांची स्मार्ट नियोजनशैली

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडुप संकुलात उभारण्यात येत असलेल्या २००० दशलक्ष लीटर प्रतिदिन (एमएलडी) क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या कामात पाणी पुरवठा प्रकल्प विभागातील अभियंत्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत महापालिकेची सुमारे ७ कोटी ४८ लाख रुपयांची आर्थिक बचत केली आहे. अति उच्चदाब विद्युत मनोरे स्थलांतरित करण्याच्या कामात प्रभावी नियोजन आणि तांत्रिक कौशल्याच्या जोरावर ही बचत शक्य



झाली. या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी संबंधित अभियंत्यांचा महापालिका मुख्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. या सन्मान सोहळ्यात कार्यकारी अभियंता राजेश कापडणीस, सहायक अभियंता ऋषिकेश वर्तक, दुय्यम अभियंता गुरुराज ऐवळे आणि दुय्यम अभियंता सुबोध नाखरेकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. भांडुप येथे उभारण्यात येणारा हा जलशुद्धीकरण प्रकल्प मुंबईच्या भविष्यातील वाढत्या पाणी गरजा लक्षात घेऊन विकसित केला जात असून, या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या अति उच्चदाब विद्युत मनोऱ्यांच्या स्थलांतराच्या प्रक्रियेत अभियंत्यांनी पर्यायी तांत्रिक उपाययोजनांचा अवलंब केला. त्यामुळे प्रकल्पाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता मोठ्या प्रमाणावर खर्चात बचत करण्यात यश आले. या कार्यक्रमाला उपायुक्त (महानगरपालिका आयुक्त कार्यालय) प्रशांत गायकवाड, उपायुक्त (विशेष अभियांत्रिकी) पुरुषोत्तम माळवदे तसेच प्रमुख अभियंता (पाणीपुरवठा प्रकल्प) सी. डी. चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. महानगरपालिका प्रशासनाने अभियंत्यांच्या या कार्याचे कौतुक करत अशा नाविन्यपूर्ण आणि खर्चबचतीच्या उपक्रमांमुळे सार्वजनिक निधीचा अधिक कार्यक्षम वापर होण्यास मदत होत असल्याचे नमूद केले. तसेच भविष्यातही विकासकामांमध्ये तांत्रिक कौशल्य, प्रभावी नियोजन आणि पारदर्शकतेच्या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### मोठ्या प्रमाणावर खर्चात बचत करण्यात यश

या सन्मान सोहळ्यात कार्यकारी अभियंता राजेश कापडणीस, सहायक अभियंता ऋषिकेश वर्तक, दुय्यम अभियंता गुरुराज ऐवळे आणि दुय्यम अभियंता सुबोध नाखरेकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. भांडुप येथे उभारण्यात येणारा हा जलशुद्धीकरण प्रकल्प मुंबईच्या भविष्यातील वाढत्या पाणी गरजा लक्षात घेऊन विकसित केला जात असून, या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या अति उच्चदाब विद्युत मनोऱ्यांच्या स्थलांतराच्या प्रक्रियेत अभियंत्यांनी पर्यायी तांत्रिक उपाययोजनांचा अवलंब केला. त्यामुळे प्रकल्पाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता मोठ्या प्रमाणावर खर्चात बचत करण्यात यश आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306